दैनिक देशदूत- 11 नोव्हेंबर, 2022

# विद्यार्थ्यांमध्ये सजगता वाढावी

## विद्यापीठातर्फे सायबर क्राईमबाबत जनजागृती



जळगाव । प्रतिनिधी

विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळा आणि किक हिल फाऊंडेशन यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत सायबर सुरक्षेबाबत जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. दि. ९ नोव्हेंबर रोजी एमबीएच्या विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेबद्दल माहिती देण्यात आली.

संगणकशास्त्र प्रशाळेचे विद्यार्थी स्वयंसेवक जय पंडित व भावेश थोरात यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. संगणक शास्त्र प्रशाळेतील विद्यार्थी स्वयंसेवक धनराज बोंडे व मानसी बोरोले यांनी सायबर सुरक्षेबद्दल संगणकशास्त्र प्रशाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दोन्ही सत्रामध्ये सायबर क्राईम विषयी त्यांनी २७० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या दोन्ही कार्यक्रमांना संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा.मनीष जोशी, समन्वयक प्रा.राजू आमले, प्रा. सुरेंद्र कापसे व किक हिल फाउंडेशन, पुणे यांच्यातर्फे महेश भडी आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या दोन्ही सत्रांना उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.